पशुचिकित्सा

# जनावरांना होणारे पचनसंस्थेचे विकार तसेच घ्यावयाची काळजी



**डॉ. गणेश काळुसे**
विषय विशेषज्ञ
(पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
(मो.नं. ९८२२२४७८९५)
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ







जनावरांना मिळेल तेवढा चारा खाण्याची सवय असते. कोणता चारा खावा आणि कोणता खाऊ नये याची निवड करता येत नसल्यामुळे; नकळत त्यांच्या पोटात अखाद्य वस्तू म्हणजेच पॉलिथिन, कपडा, ट्यूब- टायर, चप्पल, माती, वाळू हे पदार्थ जातात. या गोष्टींचा परिणाम दीर्घकाळ त्यांच्या पचनक्रियेवर होतो. त्यामुळे जनावर कमी दूध देते आणि चाराही कमी खाते.

रवंथ करणाऱ्या प्राण्यांत पोटाचे विकार जास्त प्रमाणात आढळून येतात. यामध्ये पोटफुगी, पोट गच्च होणे, अपचन हे नेहमी होणारे विकार आहेत. हे विकार चाऱ्यातील बदलामुळे होतात आणि प्राथमिक अवस्थेत ओळखल्यास उपचारामुळे बरे होतात. काही वेळेस चाऱ्यामध्ये टाचणी, सुई, दाभण, तार इत्यादी धारदार वस्तू जातात. वस्तू धारदार असल्यास पोट व छातीमधील पडद्याला छेदून हृदयाला इजा होते. हा धोका लक्षात घेऊन वेळीच पशुतज्ज्ञांकडून उपचार करून घ्यावेत.

रवंथ करणाऱ्या प्राण्यांच्या पोटाचे चार कप्पे असतात. जनावरांनी चारा खाल्ल्यानंतर हा चारा रूमेन नावाच्या कप्प्यात जातो. जनावरांच्या पोटाची रचना गुंतागुंतीची असल्यामुळे पोटाचे विकार मोठ्या प्रमाणात दिसून येतात. रवंथ करणारी जनावरे समोर दिसेल तेवढा चारा खातात आणि नंतर सावकाश रवंथ करतात. काही जनावरे कचऱ्याच्या ढिगावर, उकिरड्यावर मिळेल त्या गोष्टी खाताना दिसतात, परंतु त्यांच्याकडे नकळतच सर्वांचे दुर्लक्ष होते. जनावरांना मिळेल तेवढा चारा खाण्याची सवय असते. कोणता चारा खावा आणि कोणता खाऊ नये याची निवड करता येत नसल्यामुळे; नकळत त्यांच्या पोटात अखाद्य वस्तू म्हणजेच पॉलिथिन, कपडा, टायर ट्यूब, चप्पल, माती, वाळू हे पदार्थ जातात. या गोष्टींचा परिणाम दीर्घकाळ त्यांच्या पचनक्रियेवर होतो, त्यामुळे जनावर कमी दूध देते- चाराही कमी खाते. निकृष्ट दर्जाचा चारा खाल्ल्यास लवकर माजावर येत नाही, गाभण राहिल्यास वासराची वाढ व्यवस्थित होत नाही, तसेच त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही वेळेस चाऱ्यामध्ये टाचणी, सुई, दाभण, तार इत्यादी धारदार वस्तू जातात. वस्तू धारदार असल्यास पोट व छातीमधील पडद्याला (डायफ्रॅम) छेदून हृदयाला इजा करते. परिणामी जनावराचा मृत्यूही होऊ शकतो. धारदार वस्तूंमुळे हृदय, फुफ्फुस, पोटाचा पडदा निकामी झाल्यास महागडा औषधोपचार करूनही प्रतिसाद मिळत नाही. याउलट शेळ्या-मेंढ्या निवडक चारा खातात, त्यांच्या चारा खाण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळे त्यांच्या पोटात न पचणाऱ्या वस्तू क्वचितच जातात.

**जनावरांच्या पोटात न पचणाऱ्या वस्तू जाण्याची कारणे-**

१) दुधाळ जनावरे प्रसूतीनंतर शरीराची झालेली झीज भरून काढण्याकरिता मिळेल तो चारा खातात, त्यामुळे त्यांच्या पोटात चुकून सुई, तार जाऊ शकते. २) चारा वाया जाऊ नये, चारा व्यवस्थित खाता यावा आणि दुधाळ गायी-म्हशींचे दूध वाढावे या उद्देशाने पशुपालक चारा कापण्याच्या कटरने किंवा मशिनने चारा कापतात. मशिनमधून चाऱ्यासोबत आलेले बारीक वायरचे तुकडे, कुंपणाच्या तारांचे तुकडे जनावरांच्या पोटात जातात. यामुळे त्यांची पचनक्रिया काही प्रमाणात मंदावते. ३) जमिनीवरून चारा गोळा करून तसाच जनावरांना टाकला जातो. त्यामध्ये खिळा, वायर जाण्याची शक्यता असते. ४) शेतात किंवा आखाड्यावर ठेवलेले गाडीचे जुने टायर कालांतराने कुजून त्यातील अडकलेले खिळे गळून पडतात आणि चाऱ्यात मिसळू शकतात. ५) शरीरात क्षार व खनिजांची कमतरता असल्यास लहान वासरे, मोठी जनावरे माती खातात किंवा गोठ्यातील भिंती चाटतात. ६) कचऱ्याच्या पॉलिथिन पिशवीमधील हिरव्या पालेभाज्यांचे देठ, भाकरीचे तुकडे खाताना जनावराच्या पोटात पॉलिथिनही जाते. ७) जनावरास जास्त काळ उपाशी ठेवल्यास दिसेल तो चारा खाते.

**आजारी जनावरांची लक्षणे**

पोटात गेलेली वस्तू धारदार असल्यास, जनावर रवंथ करताना पोटाच्या हालचालींमुळे पोट आणि छातीतील पडदा छेदून अशी वस्तू हृदयाकडे जाते आणि जनावराचा मृत्यू होऊ शकतो. खडे, माती, वाळू पोटाच्या खालच्या भागात जाऊन बसतात आणि जनावरांची रवंथ करण्याची क्रिया कमी होते, त्याचा जनावरांच्या उत्पादनक्षमतेवर विपरित परिणाम होतो. धारदार वस्तू पोटात गेल्यावर जनावरे लवकर लक्षणे दाखवतात. वस्तूचा प्रकार आणि तिची पोटातील दिशा यावर ही लक्षणे अवलंबून असतात.

सुरवातीला जनावरांचे चारा खाणे पूर्ण बंद होते. दूध उत्पादनात अचानक तीनपट घट येते. जनावरास उठायला-बसायला त्रास होतो. औषधोपचार करूनही वारंवार पोट फुगूनच राहते. पोट दुखल्यामुळे जनावर पोटाकडे पाहते, दात खाते, पाठ ताणते. जास्त वेळ उभे राहाते आणि बसताना पोटात वस्तू टोचल्यामुळे त्रास झाल्यास एकदम अंग टाकून देते. शेण कमी प्रमाणात आणि घट्ट टाकते. शेण टाकताना आणि लघवी करताना त्रास होऊ शकतो.

**अशी घ्या काळजी-**

जनावर शेतात चरावयास सोडल्यास ते टायर ट्यूब, कपडा, पॉलिथिन खाणार नाही याकडे लक्ष ठेवावे. दुधाळ जनावरांच्या खुराकात नियमित क्षार मिश्रणे मिसळावीत. गोठ्यात खनिज मिश्रणाच्या विटा जनावरास चाटता येतील, अशा बेताने त्या टांगत्या ठेवाव्यात. जनावरांचा चारा कापताना कटरमध्ये वायरचे किंवा तारांचे तुकडे जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. जनावरास नियमित जंतनाशके पाजावीत. जनावरास पाणी देताना त्यात थोडेसे मीठ टाकावे. (कुठलाही औषधोपचार करण्याअगोदर पशुवैद्याचा सल्ला घ्यावा.) ■